**दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड आयुक्तालय**
**पत्ता:- यमुणानगर, निगडी, पुणे.**
**इमेल आयडी- piantideco.pcpc-mh@gov.in**

**प्रेसनोट दिनांक २७/०६/२०२३**

## तळेगाव दाभाडे येथिल ०२ सराईत गुन्हेगारांकडुन ०४ पिस्टल व १४ जिवंत काडतुसे दरोडा विरोधी पथकाकडुन जप्त

मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चोबे सो. यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची बातमी प्राप्त करुन त्यांचेविरुध्द कडक कार्यवाही करणेबाबत आदेश दिलेले होते.

त्यानुसार आमचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील दरोडा विरोधी पथकातील पोलीस निरीक्षक जितेद्र कदम, अधिकारी व अंमलदार हे अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची गोपनीय बातमी प्राप्त करीत असताना **पोलीस नाईक १४५८ आशिष बनकर व पोलीस शिपाई २६७३ सुमित देवकर** यांना दि.२५/०६/२०२३ रोजी ''मावळ तालुक्यातील सराईत गुन्हेगार प्रमोद सांडभोर व शरद साळवी हे कोणतातरी गंभिर गुन्हा करण्याच्या उद्देशाने तळेगाव दाभाडे एस टी बस स्टॅण्ड परिसरामध्ये येणार असुन त्यांनी त्यांचे कमरेस पिस्टल लावलेले आहे.'' अशी खात्रीशिर बातमी प्राप्त झाली.

त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचे अधिपत्याखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोलीस नाईक १४५८ आशिष बनकर, पोलीस नाईक १२३४ प्रविण कांबळे, पोलीस नाईक १७२२ गणेश कोकणे, पोलीस नाईक १०६२ गणेश हिंगे, पोलीस शिपाई २६४३ गणेश सावंत, पोलीस शिपाई २९४७ विनोद वीर व पोलीस शिपाई २६७३ सुमित देवकर या पथकाने दि.२५/०६/२०२३ रोजी २०/१५ वा दरम्यान तळेगाव दाभाडे एस टी बस स्टॅण्ड परिसरामध्ये सापळा लावला असताना सराईत आरोपी नामे १. प्रमोद सोपान सांडभोर वय - ३३ वर्षे, रा तळेगाव स्टेशन जवळ, हरणेश्वर वाडी, बौध्द विहार जवळ, तळेगाव दाभाडे, पुणे २. शरद मुरलीधर साळवी, वय - ३० वर्षे, रा धनगर बाबा मंदीर मागे, ज्ञानेश्वर कॉलनी, काळेवाडी, पुणे. मुळ रा - महारवाडा, अवहातरबाला, बदनापुर, जालना हे त्याठिकाणी एका निळया रंगाच्या मारुती सुझुकी ऑल्टो कार मध्ये येवुन खाली उतरले. पोलीसांनी त्यांना पकडणेकरीता सापळा लावले असल्याचे त्यांचे लक्षात आल्यावर नमुद आरोपी हे वेगवेगळया दिशेने पळुन जाण्याच्या प्रयत्नात असताना नमुद पथकाने अतिशय शिताफीने त्यांचा पाठलाग करुन ताब्यात घेतले. सदर दोन्ही आरोपी यांची झडती घेतली असता त्या दोघांनीही त्यांचे कमरेस लोखंडी गावठी पिस्टल खोचलेले असल्याचे व त्यामध्ये प्रत्येकी ०२ जिवंत काडतुसे (राऊंड) असल्याचे दिसुन आले. तसेच नमुद आरोपी ज्या मारुती सुझुकी ऑल्टो कार मधुन आलेले होते, त्या कारची पाहणी केली असता सदर कार मध्ये ०२ लोखंडी गावठी पिस्टल व १० जिवंत काडतुसे (राऊंड) मिळुन आले. त्यांचेकडुन १,६०,००० /- रुपये किंमतीचे ०४ गावठी पिस्टल, ७,००० /- रुपये किंमतीचे १४ जिवंत काडतुसे (राऊंड) व १,००,००० /- रुपये किंमतीची मारुती सुझुकी ऑल्टो कार ही जप्त करण्यात आलेली आहे.

नमुद आरोपी यांचेकडे केलेल्या तपासात अटक आरोपी शरद साळवी याने त्यांचे इतर ०३ आरोपी साथिदारांसह मध्यप्रदेश राज्यामध्ये जावुन सदर गावठी पिस्टल व जिवंत काडतुसे (राऊंड) आणले असल्याचे निष्पन्न झाले आहे. अटक आरोपी प्रमोद सोपान सांडभोर याचेविरुध्द खुन तसेच खुनाचा प्रयत्न यासारखे एकुण ०८ गुन्हे दाखल असुन आरोपी शरद मुरलीधर साळवी याचेविरुध्द खुन, मारामारी व बलात्कार असे एकुण ०३ गुन्हे दाखल आहेत. तसेच पाहिजे आरोपी यांचेवर सुध्दा गंभिर गुन्हे दाखल असुन पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. नमुद आरोपीविंरुध्द तळेगांव दाभाडे पोलीस स्टेशन, पिं.चि. येथे गु. र. नं. २९५/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५), भा.द.वि.क. ३४ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन नमुद आरोपी यांनी कट करुन ठराविक उद्देश साध्य करण्याच्या हेतुने अग्निशस्त्र आणल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असुन त्यांना वेळेत अटकाव करुन पोलीसांनी त्यांचा कट उधळुन लावला आहे. यामध्ये अजुन इतर साथीदार कोण आहेत त्याबाबत पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम हे अधिक तपास करीत आहेत.

सदर उल्लेखनीय कामगिरी ही मा. श्री. विनयकुमार चौबे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, पिं. चिं., मा. स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, पिं चि., मा श्री सतिश माने सो. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पिं चिं., मा श्री बाळासाहेब कोपनर सो. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पिं चिं., यांच्या मार्गदर्शनाखाली जितेद्र कदम, पोलीस निरीक्षक, दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोलीस अंमलदार आशिष बनकर, प्रविण कांबळे, गणेश कोकणे, गणेश हिंगे, गणेश सावंत, विनोद वीर, सुमित देवकर, महेश खांडे, उमेश पुलगम, प्रविण माने, राजेश कौशल्य, राहुल खारगे, समिर रासकर, नितीन लोखंडे ,चिंतामण सुपे व अमर कदम सर्व नेमणुक दरोडा विरोधी पथक गुन्हे शाखा यांनी केली आहे. सदर उल्लेखनीय कामगिरीबद्दल मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी दरोडा विरोधी पथकास उत्तेजनार्थ रू. ५०,०००/- चे बक्षीस घोषित केले आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप आयुक्त,
गुन्हे शाखा, पिंपरी चिचवड